**मे. सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड, रेमी कमर्शिओ, ६०१, ६ वा मजला, शाह इंडस्ट्रीयल इस्टेट, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३ यांच्या स. न. ११, १२, ३२, ३३, ३७, ५१, ५२, ५४, ६९, ७३/१, ७३/२, ७६/१, ७६/२, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२/१, ८२/२, ८२/३, ८२/४, ८२/५, मौजा वडलापेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली येथे प्रस्तावित १.६ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या बेनिफिकेशन प्लांट, १.२ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचा पॅलेट प्लांट आणि ८X३५० टन प्रतिदिन क्षमतेचा स्पॉन्ज आर्यन प्लांट तसेच ०.७५ टन प्रतिवर्ष क्षमतेची इंडक्शन फरनेस व ०.७५ टन प्रतिवर्ष क्षमतेची रोलींग मिल व १२० मेगावॅट क्षमतेच्या वीज निर्मिती प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी इतिवृत्त**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २५/०३/२०२५ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | डीपीसी हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, गडचिरोली, ता. जि. गडचिरोली. |

**प्रस्तावनाः-**

मे. सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड, रेमी कमर्शिओ, ६०१, ६ वा मजला, शाह इंडस्ट्रीयल इस्टेट, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३ यांनी त्यांच्या स. न. ११, १२, ३२, ३३, ३७, ५१, ५२, ५४, ६९, ७३/१, ७३/२, ७६/१, ७६/२, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२/१, ८२/२, ८२/३, ८२/४, ८२/५, मौजा वडलापेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली येथे प्रस्तावित १.६ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या बेनिफिकेशन प्लांट, १.२ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचा पॅलेट प्लांट आणि ८X३५० टन प्रतिदिन क्षमतेचा स्पॉन्ज आर्यन प्लांट तसेच ०.७५ टन प्रतिवर्ष क्षमतेची इंडक्शन फरनेस व ०.७५ टन प्रतिवर्ष क्षमतेची रोलींग मिल व १२० मेगावॅट क्षमतेच्या वीज निर्मिती प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड, रेमी कमर्शिओ, ६०१, ६ वा मजला, शाह इंडस्ट्रीयल इस्टेट, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३ यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक १३/०१/२०२५ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी गडचिरोली, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प

स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र देशोन्नती, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द हितवाद, नागपूर यात इंग्रजीत दिनांक २४/०२/२०२५ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, VCA समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
३. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२.
४. प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.
६. जिल्हा परिषद, गडचिरोली.
७. जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली.
८. उप-विभागीय कार्यालय, अहेरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली.
९. तहसिल कार्यालय, अहेरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली.
१०. नगर पंचायत अहेरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली.
११. पंचायत समिती कार्यालय, अहेरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली.
१२. ग्रामपंचायत कार्यालय, खमनचेरू, ता. अहेरी, जि. गडचिरोली
१३. ग्रामपंचायत कार्यालय, महागाव (खु), ता. अहेरी, जि. गडचिरोली
१४. ग्रामपंचायत कार्यालय, राजपूर (पॅच), ता. अहेरी, जि. गडचिरोली
१५. ग्रामपंचायत कार्यालय, बोरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली
१६. ग्रामपंचायत कार्यालय, वानगेपल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली
१७. ग्रामपंचायत कार्यालय, टेकडामोटला, ता. अहेरी, जि. गडचिरोली
१८. ग्रामपंचायत कार्यालय, येल्ला, ता. अहेरी, जि. गडचिरोली
१९. ग्रामपंचायत कार्यालय, शांतीग्राम, ता. अहेरी, जि. गडचिरोली

२०. ग्रामपंचायत कार्यालय, चतगुर्ता, ता. अहेरी, जि. गडचिरोली
२१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते २० वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-२२/२०२५ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२५०३१८-एफटीएस-००५२ दिनांक १८/०३/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत एकही सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झाले नाहीत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-१ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्त:-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. नंदकुमार लोमटे, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी श्री. अविश्यांत पंडा, भा.प्र.से., जिल्हादंडाधिकारी गडचिरोली तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. उमाशंकर भादुले, समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठ्या संख्येने उपस्थित

स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या:-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही

पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

१) **श्री. निरंजन धनाजी दुर्गे, चिंतलपेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वडलापेठ येथे प्रस्तावित सूरजागड इस्पात प्रकल्पाला आमचे समर्थन आहे. कंपनीने स्थानिक नागरीकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. कंपनीलगतच्या परिसरातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ कंपनीने त्यांच्या CSR फंडातून द्यावा. कंपनी प्राणहिता नदीतून पाण्याचा उपसा करते. कंपनीने प्राणहिता नदीतून लगतच्या शेतकऱ्यांसाठी पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी जेणेकरून शेतीकरिता पुरेसा पाणी पुरवठा होईल व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

२) **श्री. महेश अलोणे, महागाव, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपल्या परिसरात लोह उत्पादनाकरिता मोठ्या प्रमाणात कच्च्या मालाची उपलब्धता असून त्या प्रक्रिया करणारा उद्योग या परिसरात उपलब्ध नव्हता. परंतु या परिसरात मे. सुरजागड इस्पात प्रा. लि. ही कंपनी या क्षेत्रात प्रस्तावित असून स्थानिकांसाठी ही गर्वाची बाब आहे. या क्षेत्रात कंपनी आल्यास या क्षेत्रात पायाभूत सुविधा येतील ज्यामध्ये गडचिरोली जिल्हा आज सर्वात मागे आहे. यामध्ये प्रामुख्याने आरोग्य व शिक्षणाच्या सुविधेचा समावेश आहे. स्थानिकांना उपचारासाठी मोठ्या शहरात खाजगी दवाखान्यांमध्ये जावे लागते. कंपनीने आमच्या परिसरात चांगल्या आरोग्य विषयक साई सुविधा उपलब्ध करून द्याव्या. तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्यात यावी व २४ तास उपचार उपलब्ध करून देण्यात यावा. परिसरात प्राथमिक शिक्षणाचा स्तर ऊंचावण्यात यावा जेणेकरून स्थानिक युवक आजच्या स्पर्धेमध्ये टिकू शकतील. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीने चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून द्याव्या जेणेकरून पुढील पिढी त्याचा लाभ घेऊ शकतील. कंपनीने उच्च शिक्षीत स्थानिक युवकांना व युवतींना रोजगारात प्राधान्य द्यावे. ज्यामुळे स्थानिकांचे जीवनमान ऊंचावण्यास मदत होईल. स्थानिक महिला आर्थिकदृष्ट्या संपन्न नसल्यामुळे त्यांच्यातील कौशल्य दाखवू शकत नाहीत. त्यामुळे कंपनीने स्थानिक महिलांना रोजगार द्यावा व त्यांना आर्थिकदृष्ट्या संपन्न करावे. ज्यामुळे त्यांचे कौशल्य जगापुढे दाखवू शकतील. उद्योग आल्यामुळे परिसरातील पर्यावरणाचा ऱ्हास होणार आहे त्यामुळे कंपनीने पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्या. मी सदर कंपनीचे वडलापेठ येथे स्वागत करत आहे व सदर प्रकल्पास माझा पाठिंबा आहे. | |

**३) <u>श्री. रामलु कुळमेथे, माजी सरपंच व विद्यमान ग्रामसभा अध्यक्ष, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी सर्वप्रथम सुरजागड इस्पात कंपनीचे मन:पूर्वक स्वागत करतो. कंपनीने स्थानिक युवकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण द्यावे व त्यानंतर स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. कंपनीने परिसरातील प्रत्येक गावामध्ये दोन रूग्णवाहिका उपलब्ध करून द्याव्यात जेणेकरून परिसरातील आरोग्य विषयक समस्यांचे वेळेत निराकरण करणे शक्य होईल. तसेच कंपनीने पश्चिम विदर्भात ज्याप्रमाणे पाटबंधारे विभागाद्वारे शेतकऱ्यांना पाण्याची सुविधा पूरविण्यात येते त्याचप्रमाणे स्थानिक शेतकऱ्यांना देखील कंपनीने शेतीसाठी पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावे. त्याकरिता कंपनीने गावातील छोट्या नद्यांवर व नाल्यांवर बंधारे बांधावे. तसेच कंपनीने परिसरातील खड्डेमय रस्त्यांची दुरूस्ती करावी जेणेकरून उत्पादीत मालाची वाहतूक करणे व स्थानिकांना दळण वळण करणे सोईचे होईल. कंपनीने शेतकऱ्यांना दत्तक घेऊन त्यांच्या शेतामध्ये फळ झाडे लावावे व त्यांना फळांचे उत्पादन घेण्यास प्रोत्साहन द्यावे. कंपनीने परिसरातील शासकीय शाळांना दत्तक घेऊन तेथे डिजीटल शाळा उभारावी जेणेकरून शैक्षणिक सुविधेचा स्तर ऊंचावण्यास मदत | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

| | | |
|---|---|---|
| | होईल. कंपनीने मी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांचे निराकरण करावे ही आमची मागणी आहे. | |

४) **कु. दिपाली भाऊराव सोनाकर, चिंतलपेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गडचिरोली जिल्ह्यामध्ये रोजगार, शिक्षण, आरोग्य व रस्त्यांच्या अभावी स्थानिकांचा विकास झालेला नाही. या परिसरात उद्योग आल्याने रोजगार, शिक्षण, आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध होणार असल्याने मी कंपनीचे स्वागत करते. सदर परिसरात उद्योग आल्यामुळे स्थानिक युवकांना शासकीय स्पर्धा परिक्षेच्या तयारी करण्याकरिता स्पर्धा परिक्षा केंद्र सुरू झाले आहे. सदर परिक्षा केंद्रामध्ये जवळपासच्या २०-३० कि.मी अंतरावरून विद्यार्थी शिक्षण घेण्याकरिता येतात व त्याकरिता कंपनीने दळण वळणाकरिता वाहनाची सुविधा पूरविलेली आहे. त्यामुळे स्थानिक युवकांना स्पर्धा परिक्षेची माहिती व त्याप्रकारच्या संधी उपलब्ध होत आहेत. परिसरातील उच्च शिक्षीत तरूण/तरूणींना रोजगारासाठी पुणे किंवा नागपूर या सारख्या ठिकाणी जावे लागते. आमच्या परिसरात कंपनी आल्यामुळे रोजगाराचा प्रश्न सुटणार अशी आम्हाला आशा आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

५) **कु. सोनाली कोवे, खमेनचुरू, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या क्षेत्रामध्ये शिक्षणाची अपुरी सुविधा आहे व कंपनी शैक्षणिक सुविधा पूरवित आहे, ही चांगली बाब आहे. परिसरामध्ये दवाखाने व ग्रंथालय उपलब्ध झाले पाहिजे. परिसरात एखादा अपघात झाला तर उपचारासाठी दुसऱ्या जिल्ह्यात जावे लागते. परिसरात चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध झाल्या तर उपचारासाठी दुसऱ्या जिल्ह्यात जावे लागणार नाही. कंपनी परिसरात शैक्षणिक व आरोग्य विषयक सुविधा पुरवत आहे. कंपनीने गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठविले आहे. परिसरात चांगले रस्ते बांधण्यात यावे. तसेच महिलांना | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

| | | |
|---|---|---|
| | रोजगार मिळाला पाहिजे. कंपनीमध्ये ७००० रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे परिसरातील नागरीकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होईल व प्रकल्पामध्ये रोजगार मिळेल. हेद्री येथे सुसज्जित दवाखाना उपलब्ध आहे. | |

६) **श्री. अखिल प्रकाशराव कोडपकवार, बोरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रस्तावित कंपनीला माझे समर्थन आहे. परंतु कंपनीने स्थानिकांना रोजगारात प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. परराज्यातील किंवा दुसऱ्या जिल्ह्यातील युवकांना येथे रोजगारात प्राधान्य देण्यात येऊ नये. तसेच कंपनीने परिसरामध्ये दवाखाना सुरू करावा जेणेकरून अपघात झाल्यास उपचार उपलब्ध होईल. शिक्षणाकरिता स्थानिक विद्यार्थ्यांना दुसऱ्या जिल्ह्यात जावे लागते. याकरिता कंपनीने स्थानिक पातळीवर उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. स्थानिकांना शिक्षण, आरोग्य, पाणी व वीज या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. कंपनीने फक्त आश्वासन न देता त्यांची पूर्तता केली पाहिजे. त्याचप्रमाणे आमच्या परिसरात हेद्रीप्रमाणे मोठा दवाखाना तयार करण्यात आला तर येथील नागरीकांचा जीव वाचवण्यास मदत होईल. कंपनीला विनंती आहे की त्यांनी दिलेली आश्वासने फक्त कागदापूर्ती मर्यादित न ठेवता त्यांची पूर्तता करावी. कंपनीने स्थानिक युवकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. सुरजागड प्रकल्पात जे घडत आहे त्याची येथे पुनरावृत्ती होता कामा नये. कंपनीने स्थानिकांची मदत केली तर स्थानिक नागरीक देखील कंपनीला सहकार्य करतील. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

७) **श्री. सुनिल मधुकर मडावी, वडलापेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी सुरजागड इस्पात प्रा. लि. या कंपनीमध्ये एक कर्मचारी म्हणून कार्यरत आहे. वडलापेठ हे एक ५० घरांचे छोटे गाव आहे. सुरजागड इस्पात कंपनीमुळे या गावाला ओळख | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

| | | |
|---|---|---|
| | मिळाली आहे. सुरजागड इस्पात कंपनीमुळे स्थानिक नागकरीकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. कंपनीमुळे स्थानिक नागरीक इंग्रजी भाषेमध्ये संभाषण करू शकत आहेत. कंपनीमुळे पुढे देखील स्थानिकांचा विकास होईल. | |

८) **श्री. महेश तरबदार, शांतीग्राम, ता. मुलचेरा, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे प्रकल्प प्रवर्तताने पायाभूत सुविधा पूरविण्याबाबत सादरीकरण दिले. या प्रकल्पामुळे सर्वात जास्त प्रमाणात शिक्षण व व्यावसायिक क्षेत्रात स्थानिकांना फायदा होणार आहे. शिक्षणाविना आमची प्रगती होऊ शकत नाही. शिक्षणाशिवाय कोणताही व्यवसाय करणे शक्य नाही. जर कंपनी आमच्या परिसरात आली तर येथे शिक्षणाचा स्तर ऊंचावणार. गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येक गावात किमान १०० बेरोजगार मिळतील. आमच्या गावांमध्ये १०-१० कि.मी अंतरापर्यंत शाळा उपलब्ध नाहीत. स्थानिक नागरीकांकडे शिक्षणासाठी पैसे नाहीत. मी कंपनीचे आभार मानतो कि त्यांनी या क्षेत्रामध्ये शैक्षणिक सुविधा पूरविण्याबाबत विचार केला. या कंपनीमुळे स्थानिक छोट्या मोठ्या व्यवसायांना फायदा होईल. शिक्षित व अशिक्षित नागरीक छोटे मोठे व्यवसाय उभारतील व त्यांची उपजिविका कमवतील. कंपनीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही. कंपनीद्वारे येथे ९०० झाडांची कत्तल होणार आहे व त्या ठिकाणी जवळपास १.० लक्ष झाडांची लागवट होणार आहे ज्यामुळे पर्यावरणाचे समतोल राखण्यास मदत होईल. सदर कंपनीमुळे स्थानिकांना फायदा होणार आहे. गडचिरोली जिल्ह्याला मागास जिल्हा म्हणून ओळखले जाते. सदर कंपनीमुळे स्थानिकांना पुढील शिक्षणाबाबत योग्य तो मार्ग मिळेल. स्थानिक विद्यार्थी १२ वी पास, आयटीआय पास व इतर क्षेत्रामध्ये पदवी घेऊन बेरोजगार आहेत. त्यांना कंपनीमध्ये रोजगार मिळण्याकरिता उपयुक्त अशा शिक्षणाची गरज आहे. सुरजागड कंपनीचे मी स्वागत करतो. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

९) **<u>श्री. ज्योतिष भंजन, वडलापेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सर्वप्रथम मी कंपनीच्या मालकांना धन्यवाद देतो की त्यांची गडचिरोली जिल्ह्यामध्ये त्यांचा उद्योग उभारण्याचा निर्णय घेतला. सदर प्रकल्पामुळे वडलापेठ गावाची ओळख निर्माण झाली. कंपनीतर्फे वृक्षारोपणाचे काम सुरू आहे. पर्यावरणाचे संरक्षण करण्यात येईल. तसेच फळबाग विकसित करण्यात येईल. कंपनीतर्फे स्थानिकांना रोजगार देण्यात येईल. आम्हाला रोजगारासाठी बाहेर जावे लागायचे. प्रकल्प प्रवर्तकांनी आमच्या गावात घरोघरी जाऊन स्थानिकांच्या समस्या जाणून घेतल्या. प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिकांना प्रकल्पामध्ये रोजगार दिलेला आहे. स्थानिकांना आता बाहेर राज्यात किंवा दुसऱ्या शहरात रोजगारासाठी जाण्याची गरज नाही. त्यामुळे कंपनीला माझे समर्थन आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

१०) **<u>सौ. लक्ष्मी नैताम, वडलापेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी कंपनीमध्ये कर्मचारी आहे. आमच्या गावातील मुलं कंपनीने आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतात याचा मला आनंद आहे. माझे कंपनीला समर्थन आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

११) **<u>सौ. भारती झुनके, वडलापेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज वडलापेठ येथे कंपनी आल्यामुळे मला शिक्षण मिळत आहे. आमच्या गावात कंपनी यायलाच पाहिजे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

१२) **सौ. प्रणाली कोडापे, वडलापेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी सुरजागड इस्पात कंपनीमध्ये शिक्षण घेत आहे. कंपनीने आयोजित केलेल्या स्पर्धामध्ये माझा मुलगा सहभाग नोंदवतो व तेथे त्याला चांगले शिक्षण मिळत आहे या चा मला आनंद आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

१३) **कु. कल्पना भुमय्या आत्राम, जामगांव, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज सर्वात मोठी समस्या बेरोजगारीची आहे. बेराजगारीची समस्या असल्याने आम्हाला इतर शहरांमध्ये जावे लागते. तसेच परिवाराची आर्थिक परिस्थिती वाईट असल्याने आम्ही आमची स्वप्ने पूर्ण करू शकत नाही. आम्ही प्रकल्प प्रवर्तकांपुढे आमच्या समस्या मांडल्या. त्यानूसार कंपनीने परिसरात अकादमी, ग्रंथालय, संगणक व शिक्षक उपलब्ध करून दिले. तसेच शारीरीक शिक्षणासाठी शिक्षक उपलब्ध करून दिले. त्यामुळे आम्ही शासकीय नौकरीचे स्वप्न पूर्ण करू शकतो. स्थानिक नागरीकांमध्ये शिक्षणाचा अभाव असल्याने त्यांना त्यांचे मुद्दे उपस्थित करता येत नव्हते. कंपनीमुळे आज स्थानिक नागरीक त्यांचे मुद्दे उपस्थित करू शकत आहेत. मी या कंपनीचे समर्थन करते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

१४) **श्री. सुरेंद्र आत्राम, वडलापेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे मद्दा उपस्थित करण्यात आला होता की कित्येक कंपनी येतात व दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात येत नाही. परंतु सदर कंपनीने प्रकल्प कार्यान्वित होण्यापूर्वीच स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. प्रकल्प कार्यान्वित होण्यापूर्वीच कंपनीने २६ स्थानिकांना रोजगार दिलेला आहे. तसेच त्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. स्थानिकांना इंग्रजी | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

| | | |
|---|---|---|
| | भाषेचे ज्ञान नव्हते. परंतु कंपनीने त्यांना इंग्रजी बोलण्याचे प्रशिक्षण दिले व आज ते येथे त्यांचे परिचय देऊ शकत आहेत. माझे शिक्षण १२ वी पर्यंत झाले आहे व मी शासकीय सेवामध्ये नौकरी लागण्यासाठी प्रयत्न करत होते. कंपनीने आमच्या करिता अकादमीची सुविधा केली. तसेच शारीरीक प्रशिक्षणाकरिता सैन्य दलाचे माजी अधिकारी उपलब्ध करून दिले जे प्रत्येक रविवारी आमची शारीरीक चाचणी घेतात. तसेच ग्रंथालयाची सुविधा कंपनीने करून दिले. आज गावातील व लगतच्या १५-२० कि.मी. अंतरातील विद्यार्थी ग्रंथालयामध्ये अभ्यास करण्याकरिता येतात. तसेच स्थानिक विद्यार्थ्यांकरिता ये-जा करण्यासाठी वाहनाची सुविधा पूरविण्यात आली आहे. कंपनीतर्फे मोफत प्रशिक्षण व सोई सुविधा मिळत आहेत. कंपनीचे मालक वडलापेठ, चिंतलपेठ व परिसरातील इतर गावांमध्ये सण साजरे करतात. कंपनीमुळे आमच्या सारख्या व्यक्तिंना योग्य मार्गदर्शन मिळाले. कंपनी गावात आल्यामुळे आम्हाला प्रत्येक सुविधा उपलब्ध होत आहे. कंपनीच्या मालकांनी स्थानिक नागकरीकांसाठी MS-CIT शिकण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून दिली. | |

**१५) श्री. तानाजी यादव, सदस्य पर्यावरण जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळख चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | स्थानिकांना विनंती आहे की त्यांनी पर्यावरण विषयक मुद्दे उपस्थित करावे. |

**१६) श्री. विठ्ठल देठे, चिंतलपेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ताळेबंदीनंतर कोव्हीड-१९ नंतर सीएमआयडीच्या अहवालानूसार संपूर्ण भारतात एकूण १२ कोटी लोक बेरोजगार झाले. गडचिरोली जिल्ह्यात रोजगाराची एकही संधी उपलब्ध नाही. त्यामुळे येथील तरूण वर्ग व्यसनाच्या आहारी गेला आहे. नजीकच्या काळात गडचिरोली या आदिवासी जिल्ह्यात उद्योग येण्यास सुरूवात झाली. गडचिरोली जिल्ह्यात कंपनीमुळे स्थानिक सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार मिळत असल्यास आपण कंपनीचे | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

| | | |
|---|---|---|
| | समर्थन का नाही करायचे? जर जिल्ह्यातील तरूण वर्गाला इतर राज्यात किंवा जिल्ह्यात न जाता जिल्ह्यातच रोजगार मिळत असेल तर आपण कंपनीचे स्वागत का नाही करायचे? अशिक्षीत, अकुशल कामगारांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळत आहे तर आपण कंपनीचे स्वागत का नाही करायचे? उत्पादनात वाढ होऊन स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होत आहे व स्थानिक व्यापाऱ्यांना चालना मिळत आहे तसेच स्थानिकांचे जीवनमान ऊंचावत असल्यास आपण कंपनीचे स्वागत का नाही करायचे? रस्ते, वीज, पाणी पुरवठा, शिक्षण व वैद्यकीय सुविधा परिसरात उपलब्ध होत असल्यास कंपनीचे स्वागत का नाही करायचे? कंपनीकडून कौशल्य प्रशिक्षण, शिष्यवृत्ती सारख्या सुविधा उपलब्ध होत असतील तर कंपनीचे स्वागत का नाही करायचे? स्थानिक शाळा व महाविद्यालयांसोबत भागीदारी करून शिक्षणाची सुविधा सुधारत असेल तर कंपनीचे स्वागत का नाही करायचे? | |

१७) **<u>सौ. प्रविणा भिमराव बागडे, चिंतलपेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-</u>**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | मी ग्रंथालयामध्ये सहाय्यक म्हणून काम करते. परिसरातील इतर गावातील महिलांना कंपनीकडून रोजगार मिळणार अशी मी आशा करते व कंपनीचे स्वागत करते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

१८) **<u>श्री. रवि ओल्लालवार, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य, भारतीय जनता पार्टी, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-</u>**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सर्वप्रथम मी कंपनी प्रशासनाचे अभिनंदन करतो की त्यांनी वडलापेठ येथे प्रकल्प उभारण्याकरिता प्रयत्न केले. तसेच या क्षेत्रातील सन्माननीय आमदार श्री. धर्मरावबाबा आत्राम यांनी देखील कंपनी प्रशासनाला प्रकल्प उभारण्याकरिता मदत केली त्यामुळे त्यांचे आभार मानतो. प्रकल्प लगतच्या बोरी गावातील रहिवासी शेजारच्या आंध्र प्रदेश राज्यात रोजगारासाठी जातात. परंतु कंपनी आल्यामुळे स्थानिकांना | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीमध्ये रोजगार उपलब्ध झाला आहे. माझी कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी दिना नदीमध्ये बंधारा प्रस्तावित करावा जेणेकरून दिना नदीचे पाणी वडलापेठ गावातील शेतकऱ्यांसाठी वापरता येईल व त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल. कंपनीने बोरी गावातील बेरोजगारांना प्रकल्पामध्ये रोजगार द्यावा. मे. लॉयड मेटल्स उद्योगाप्रमाणे स्थानिकांना वगळण्यात येऊ नये. कंपनीमुळे स्थानिकांच्या सुप्त गुणांचा विकास झाल्याचे दिसून येते. | |

## १९) श्री. राजेश प्रभाकर दुर्गे, महागाव (बु.), ता. अहेरी, जि. गडचिरोली:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सुरजागड परिसरात मे. लॉयड मेटल्स अॅण्ड एनर्जी लि., या उद्योगाची खाण कार्यरत आहे. सदर खाणीतून लोह खनिजाची वाहतूक होत असून त्यामुळे रस्त्याच्या कडेला असणाऱ्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नूकसान होत आहे. प्रदूषणाच्या नियमांनूसार खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर ताडपत्रीचे आच्छादन करायला पाहिजे परंतु तसे होत नाही. शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे उपस्थित केलेल्या मुद्यांकडे दुर्लक्ष केले जाते. कंपनीने शिक्षण, आरोग्य व इतर सोई सुविधा उपलब्ध करून दिल्यास त्यांचे स्वागत केले जाईल. कंपनी दिना नदीचे पाणी उपसा करून त्याचा उत्पादन प्रक्रियेमध्ये वापर करणार आहे. परंतु उद्योगातून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया न करता परत नदीमध्ये सोडले तर नदी प्रदूषित होईल. त्यामुळे जनावरांचे आरोग्य व शेत पिक धोक्यात येईल. सादरीकरणामध्ये सांगितल्या प्रमाणे उपाययोजना होतील किंवा कसे याबाबत शंका आहे. आपण फक्त सकारात्मक गोष्टींकडे लक्ष देते आहोत परंतु प्रकल्पामुळे होणाऱ्या नकारात्मक गोष्टींकडे देखील लक्ष दिले पाहिजे. गडचिरोली जिल्ह्याची स्थापना सन १९८२ मध्ये झाली. परंतु आजपर्यंत या जिल्ह्यात रोजगाराच्या संधी व विकास झालेला नाही. कंपनीने कौशल्य विकास योजनेअंतर्गत स्थानिक युवकांना प्रशिक्षण द्यावे जेणेकरून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. स्थानिकांना प्रशिक्षण देण्यात यावे व त्यांनाच रोजगारात प्राधान्य द्यावे जेणेकरून कंपनीचा फायदा होईल व सोईस्कर होईल. कंपनीने स्थानिकांच्या समस्या समजून प्रकल्पामध्ये योग्य ते बदल करावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

२०) कु. अमृता जोद्दार, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
| --- | --- | --- |
| १) | मी कंपनीचे आभार मानते की त्यांना स्थानिक बेरोजगारांना रोतगार उपलब्ध करून दिला. कंपनीने स्थानिकांचा असाच विकास करत राहावा ही अपेक्षा आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

२१) श्री. रविंद्र वासेकर, जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, जि. गडचिरोली:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
| --- | --- | --- |
| १) | या परिसरामध्ये सुरजागड लोह खनिज खाणीनंतर सुरजागड इस्पात कंपनीची स्थापना होत आहे ही एक आनंदाची बाब आहे. आज मुंबई नंतर गडचिरोली जिल्ह्यातील गुंतवणूकीबाबत चर्चा होत आहे याचा आम्हाला अभिमान आहे. गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त व संवेदनशील क्षेत्रात औद्योगिकीकरण होत असल्याचा अभिमान आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारले व गडचिरोली जिल्ह्याचा विकास करण्याचे उद्दीष्ट ठेवले त्याबाबत मी त्यांचे आभार मानतो. सादरीकरणामध्ये प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले आहे की फक्त ९०० मोठे वृक्ष तोडण्यात येणार आहेत व त्या मोबदल्यात जवळपास १.० लक्ष झाडे लावण्याचा कार्यक्रम कंपनीने आखलेला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील ७६ टक्के भाग हा वन संपत्तीने व्याप्त आहे. पर्यावरणाचे समतोल राखून औद्योगिकीकरण करण्यात यावे अशी माझी सर्व उद्योजकांना विनंती आहे. अहेरी विधानसभा क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे होत असून अहेरी विधानसभा क्षेत्राचा कायापालट झालेला आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की पर्यावरण, आरोग्य, शिक्षण व प्रदूषण विरहीत वाहने यांचा वापर करावा. मे. लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. यांच्या धरतीवर मे. सुरजागड इस्पात प्रा.लि. या प्रकल्पाने या परिसरात कार्य करावे ही अपेक्षा आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

२२) **श्री. मोहम्मद युनूस शेख, महासचिव, राष्ट्रवादी कॉंग्रस पाटी, देसाईगंज (वडसा), ता. देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मा. आ. श्री. धर्मरावबाबा आत्राम साहेबांच्या प्रयत्नांमुळे गडचिरोली जिल्ह्यात औद्योगिकीकरणास चालना मिळाली आहे. मा. आमदारा साहेबांनी सदर प्रस्तावित प्रकल्पासाठी जवळपास १०० एकर जागा दान केलेली आहे. तसेच गडचिरोली जिल्ह्याची उद्योगविरहीत जिल्हा म्हणून ओळख पुसण्याचे काम मा. आमदार साहेबांनी केले आहे. तसेच महागाव व देवळनारी या गावांमध्ये दोन मोठे उपसा सिंचन प्रकल्प तयार होत आहेत. त्यामुळे त्या परिसरातील शेतकऱ्यांना वर्षभर शेतीकरिता पाण्याची सुविधा उपलब्ध होणार आहेत. तसेच मा. अर्थमंत्री यांनी गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी जवळपास रू. ५०० कोटी मंजूर केलेले आहेत. आमचा या प्रकल्पास समर्थन देतो. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

२३) **डॉ. देवराव होळी, माजी आमदार, गडचिरोली विधानसभा क्षेत्र, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझा सदर प्रकल्पास पूर्ण पाठिंबा आहे. कोनसरी येथे लोह खनिज प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अहेरी विधानसभा क्षेत्रात देखील लोह खनिज प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्याबाबत मी मा. आमदार साहेबांचे खूप खूप अभिनंदन करतो. मा. पंतप्रधान यांनी सन २०१४ मध्ये संपूर्ण भारतामध्ये औद्योगिकीकरणाला चालना देण्याचे ध्येय ठेवले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री यांनी देखील मेक इन महाराष्ट्र चे उद्दीष्ट ठेवले व गडचिरोली जिल्ह्याचे औद्योगिकीकरण होण्यास सुरूवात झाली असल्याचे दिसून येते. गडचिरोली जिल्ह्याचा विकास औद्योगिकीकरणाशिवाय होणे शक्य नाही. सन २०१४ व २०१९ मध्ये मी आमदार असताना गडचिरोली जिलह्यात औद्योगिकीकरण होण्यासाठी उद्योग क्रांती यात्रेचे आयोजन केले होते. राज्यातील व गडचिरोली जिल्ह्यातील सर्व आमदार व खासदारांच्या प्रयत्नांमुळे आज गडचिरोली | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

| | | |
|---|---|---|
| | जिल्ह्यात दोन लोह खनिज प्रक्रिया प्रकल्प व लोह खनिज उत्खनन प्रकल्प कार्यरत होत आहेत. भविष्यात गडचिरोली जिल्ह्यात मोठे औद्योगिक क्षेत्र निर्माण होणार आहे. कंपनी प्रशासनाने स्थानिकांना शिक्षीत करून त्यांना कंपनीमध्ये रोजगार देखील दिलेला आहे. त्याबाबत कंपनीचे आभार आहे. गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या उद्योगांसोबतच छोटे उद्योग देखील कार्यान्वित होतील अशी आशा आहे. माझी मा. जिल्हाधिकारी महोदयांना विनंती आहे की गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण व्हावे. | |

२४) **श्री. सुरेंद्र अलोणे, सामाजिक कार्यकर्ता, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मा. जिल्हाधिकारी यांनी विनंती आहे की, प्रकल्प उभारत असताना काही जाचक अटींची बाधा येत असेल तर त्यामध्ये शिथीलता देण्यात यावी. मे. लॉयड्स मेटल्स उद्योगाचा सुरजागड खाण प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला असून तेथे शिक्षण, सिंचन, आरोग्य व इतर सुविधा पूरविण्यात आल्या आहेत. परंतु या परिसरात प्रामुख्याने रोजगारात स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. मा. माजी आमदार श्री. देवराव होळी यांच्या प्रयत्नांमुळे कोनसरी येथे स्पाँज आयर्न प्रकल्प उभारण्यात आला आहे. तसेच मा. आमदार श्री. धर्मरावबाबा आत्राम यांनी सदर प्रकल्पाकरिता त्यांची जमीन दान केलेली आहे. मा. मुख्यमंत्री, मा. उप-मुख्यमंत्री व जिल्ह्याचे आमदार, खासदार व लोकप्रतिनिधी यांचे स्वप्न आहे की गडचिरोली जिल्ह्यामध्ये स्टील हबची निर्मिती व्हावी. तसेच माझी मा. जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की त्यांनी जिल्ह्यात येणाऱ्या प्रत्येक उद्योगास सहकार्य करावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

२५) **श्री. अजय कंकडलावार, माजी अध्यक्ष, जिल्हा परिषद गडचिरोली, ता. जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सुरजागड इस्पात कंपनीला आमचा विरोध नाही परंतु कंपनीने स्थानिकांना रोजगार द्यावा. गावाच्या विकासाकरिता खमेनचेरू ग्रामपंचायतीने सदर प्रकल्पाकरिता ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. खमेनचेरू ग्रामपंचायतीच्या हद्दीतील बदलापूर गावातील बेरोजगार युवकांना रोजगार मिळावा या उद्देशाने सदर प्रकल्पास ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. प्रकल्प कार्यान्वित होत असताना मालाची वाहतूक होणार आहे व या परिसरातील रस्त्यांची वहन क्षमता वाढविण्याची गरज आहे. कमी क्षमतेच्या रस्त्यावरून वाहतूक होताना रस्त्याची दुरावस्था होत व त्याची दुरूस्ती लवकरात लवकर होत नाही. सदर कंपनीकरिता प्राणहिता नदीतून पाणी उपसा करण्यात येणार आहे. अहेरी तालुक्याचा चारही बाजूने नद्या वाहत आहेत. सदर नद्यांमधून अहेरी तालुक्यात सिंचनाकरिता पाण्याची सोय कशी करता येईल याकडे लक्ष देण्यात यावे. स्थानिक बेरोजगार युवक व युवतींना रोजगार मिळाला पाहिजे. परिसरात मोठ्या प्रमाणात शिक्षीत युवक व युवती आहेत तसेच बऱ्याच नागरीकांना शिक्षणाची आवड आहे. त्यांच्याकरिता शैक्षणिक सुविधा पूरविण्यात यावी. लॉयड्स मेटल्स अ‍ॅण्ड एनर्जी लि यांच्या प्रयत्नांमुळे सुरजागड येथे दवाखाने सुरू करण्यात आले आहेत. कंपनीतून तयार होणाऱ्या मालाची वाहतूक होत असताना वाहनांना कितीही आच्छादन करून वाहूतक केली तरी देखील रस्त्यालगतच्या शेतीचे नूकसान होणार आहे. परिसरात लोह खनिजाचे उत्खनन करून त्याचा निधी जिल्हा खनिकर्म विभागाकडे जमा करण्यात येतो. सदर निधीचा शेतकऱ्यांना नूकसान भरपाई देण्याकरिता वापर करण्यात यावा ही विनंती आहे. कंपनीतून निघणारे सांडपाणी नदीमध्ये सोडण्यात येऊन नये. उद्योगातून निघणारे सांडपाणी नदीमध्ये सोडल्यास नदी प्रदूषित होऊन मत्स्यव्यवसायिकांचे नूकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वडलापेठ येथील वन विभागाअंतर्गत असलेली काही जागा नागरीकांसाठी आरक्षित करण्यात यावी. तसेच गावातील नागरीकांसाठी व जनावरांसाठी तलावाची निर्मिती करण्यात यावी किंवा, | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

| | | |
|---|---|---|
| | अस्तित्वात असलेल्या तलावाचे संवर्धन करण्यात यावे. स. नं. ७७ व ७८ ची जमीन गावाकरिता राखीव ठेवण्यात यावी. माझ्याकडून सुरजागड इस्पात कंपनीला पाठिंबा दर्शवितो. भविष्यात कंपनीने अटी व शर्तींचे पालन केले नाही तर त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी अपेक्षा आहे. | |

२६) **<u>श्री. रामचंद्र कचरू दुर्गे, चिंतलपेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे वडलापेठ येथे प्रस्तावित प्रकल्पाला समर्थन आहे. कंपनी कार्यान्वित झाल्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळणार व त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल. शासनाचे खाजगीकरणाकडे कल असल्यामुळे स्थानिकांना प्रकल्पात रोजगार मिळणार. त्यामुळे गडचिरोली जिल्हा आत्मनिर्भर होण्यास मदत होईल. पाणी, हवा व जंगल या सारख्या नैसर्गिक संसाधनांचे कंपनीने संवर्धन करावे. कंपनीने पर्यावरण संवर्धन करणे गरजेचे आहे. कंपनीने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी. परिसरातील रस्त्यांची दुरूस्ती करावी. त्यामुळे परिसरातील धुळीचे प्रमाण व अपघाताचे प्रमाण कमी होईल. कंपनीने स्थानिक युवकांना नौकरीकरिता प्रशिक्षण द्यावे. तसेच उत्तीर्ण विद्यार्थ्यांना कंपनीने पुढील उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

२७) **<u>श्री. दिपक आत्राम, माजी आमदार, अहेरी विधानसभा क्षेत्र, जि. गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सुरूवातीला गडचिरोली जिल्हा उद्योगविरहीत जिल्हा म्हणून नावाजलेला होता. परंतु मागील १-२ वर्षात या जिल्ह्यात उद्योग येत आहेत व स्थानिकांना या उद्योगांमध्ये रोजगार मिळत आहे. मागील महिन्यामध्ये याच ठिकाणी मे. लॉयड्स मेटल्स या उद्योगाच्या ०२ जनसुनावण्या घेण्यात आल्या. या परिसरात मे. लॉयड मेटल्स यांच्या माध्यमातून जवळपास १५-२० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहे. मागील | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

| | | |
|---|---|---|
| | जनसुनावणीदरम्यान कंपनीने भविष्यात आणखी ६५०० रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील अशी माहिती कंपनीने दिलेली आहे. परंतु असे असताना देखील स्थानिक पातळीवर बेरोजगारीचे प्रमाण खूप जास्त असून त्यामागची कारणे वेगळी आहेत. त्यामध्ये आर्थिक परिस्थिती, शेतीची नापिकी, पावसाचे कमी प्रमाण, शेतीमध्ये असलेल्या विहीरी, तलाव यामध्ये पाण्याची उपलब्धता नसणे, इत्यादी कारणे आहेत. शासकीय विभागांमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणावर नौकऱ्या उपलब्ध होऊ शकत नाहीत. दरवर्षी ४०००-५००० या दराने बेरोजगारांची संख्या वाढत आहे. बेरोजगारीच्या समस्येचे निराकरण करावयाचे असल्यास जिल्ह्यामध्ये मोठ्या उद्योगांशिवाय पर्याय उपलब्ध नाही. शासकीय विभागांमध्ये जिल्हा स्तरावर देखील ५० नौकऱ्यांपेक्षा जास्त रोजगार देणे शक्य नाही. मी सन २००९ ते २०१४ दरम्यान आमदार असताना तत्कालीन गृह मंत्री यांच्याशी गडचिरोली जिल्ह्याचा विकास कसा करता येईल याबाबत चर्चा व्हायची. गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात लोह खनिज उपलब्ध असून त्यावर प्रक्रिया करणारे जास्तीत जास्त उद्योग या जिल्ह्यात यावे व त्यामध्ये स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार देण्यात यावा. ज्यामुळे येथील बेरोजगारीचे प्रमाण कमी येईल व इतर समस्यांचे निराकरण होईल. गडचिरोली जिल्ह्याची त्यावेळी परिस्थिती ही संवेदनशील व नक्षलग्रस्त होती. परंतु आज प्रशासनाच्या प्रयत्नांमुळे गडचिरोली जिल्ह्यातील परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली आहे. एकेकाळी कंपनीच्या अधिकाऱ्यांना जंगल परिसरात जाता येत नव्हते, परंतु आज तेथे जाणे शक्य झाले आहे. उद्योग आल्यामुळे परिसरातील पर्यावरणाचे नूकसान देखील होणार आहे. गडचिरोली जिल्ह्याचे पर्यावरण संवर्धन करणे व उद्योग चालविणे एकत्र शक्य होणार नाही. कंपनीमुळे होणाऱ्या प्रदूषणाचे प्रमाण कसे कमी करता येईल याचे नियोजन कंपनीने करावे. उद्योगांमुळे वायु, जल, माती प्रदूषित होणार आहे. त्याबाबत कंपनीने उपाययोजना करायला हव्या. येथे येणाऱ्या कंपन्यांनी प्रदूषणाचे प्रमाण कमी केले व त्यावर उपाययोजना केल्या तर याचा फायदा स्थानिक बेरोजगारांना होईल. परिसरातील सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगारात प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. सदर कंपनी बांधकाम सुरू करताना जवळपास १५० ते २०० | |

| | | |
|---|---|---|
| | लोकांना प्रशिक्षण देत आहेत. तसेच सुशिक्षीत बेरोजगारांकरिता तलाठी, ग्रामसेवक, वनरक्षक, वनपाल इत्यादी पदांकरिता स्पर्धा परिक्षा केंद्र उभारले आहेत. मागील ४-५ महिन्यांपासून प्रशिक्षण देण्याचे काम सुरू असून त्याची एक बॅच पूर्ण झालेली आहे व दुसरी बॅच पुन्हा घेण्याचे नियोजन आहे. जवळपास ६०-६५ महिलांचे शिवणकलेचे प्रशिक्षण देण्यात येत आहेव त्यामध्ये आणखी वाढ करण्यात येणार आहे. जी कंपनी अस्तित्वात येण्याच्या अगोदरपासून स्थानिक लोकांचा विचार करत असेल तर अशा कंपनीचे आपण समर्थन केले पाहिजे. एखाद्या प्रशिक्षीत उच्च शिक्षीत बेरोजगारास प्रकल्पात रोजगार दिला तर तो कंपनीच्या विरोधात जाऊ शकत नाही. कंपनीने रोजगाराबाबतच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करता कामा नये. पसिरातील अतांत्रिक विद्यार्थ्यांना कंपनीने तांत्रिक प्रशिक्षण द्यावे व त्यांना प्रकल्पामध्ये रोजगार द्यावा. मागील जनसुनावणीदरम्यान देखील परराज्यातील व बाहेरच्या जिल्ह्यातील बेरोजगारांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. कंपनीने प्रशिक्षणाकरिता लागणाऱ्या खर्चाचे विवरण तयार करावे व प्रत्येक विद्यार्थ्याला येणाऱ्या खर्चाची नोंद करून ठेवावी. तसेच रोजगार देताना सदर विद्यार्थ्याच्या वेतनातून त्यावर झालेला खर्च कपात करण्यात यावा. या धोरणाबाबत लवकरात लवकर कंपनीने निर्णय घेतला पाहिजे. कंपनीने लगतच्या परिसरातील गावातील युवकांना ८० टक्के रोजगारात प्राधान्य दिले पाहिजे. कंपनीतून सांडपाणी निर्माण होऊन परिसरातील नद्या प्रदूषित होणार आहे. कंपनीतून निघणाऱ्या सांडपाण्यावर योग्य त्या उपाययोजना करून प्रक्रियाकृत सांडपाण्याच्या पुनर्वापर कंपनीने केला पाहिजे. तसेच परिसरातील नद्या प्रदूषित होणार नाही याची जबाबदारी घेतली पाहिजे. कंपनीने परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे उत्पन्न कसे वाढतील याबाबत स्थानिक शेतकऱ्यांना मार्गदर्शन व मदत करावी. कंपनीने स्थानिक शेतकऱ्यांना शेतीउपयोगी संसाधने कमीत कमी दरामध्ये कसे उपलब्ध करून देता येईल याबाबत नियोजन करावे. तसेच सिंचनाबाबत शेतकऱ्यांची मदत करावी. | |

२८) **श्री. धर्मरावबाबा आत्राम, आमदार, अहेरी विधानसभा क्षेत्र, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात खनिज संपत्ती उपलब्ध आहे परंतु लोह खनिज प्रक्रिया करणारा उद्योग येथे उपलब्ध होऊ शकला नाही. मे. सुरजागड इस्पात प्रा. लि. स. न. ११, १२, ३२, ३३, ३७, ५१, ५२, ५४, ६९, ७३/१, ७३/२, ७६/१, ७६/२, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२/१, ८२/२, ८२/३, ८२/४, ८२/५, मौजा वडलापेठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली येथे प्रस्तावित १.६ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या बेनिफिकेशन प्लांट, १.२ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचा पॅलेट प्लांट आणि ८X३५० टन प्रतिदिन क्षमतेचा स्पॉन्ज आर्यन प्लांट तसेच ०.७५ टन प्रतिवर्ष क्षमतेची इंडक्शन फरनेस व ०.७५ टन प्रतिवर्ष क्षमतेची रोलींग मिल व १२० मेगावॅट क्षमतेच्या वीज निर्मिती प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणीला माझे समर्थन आहे. कंपनी पसिरातील ९०० मोठ्या झाडांची कत्तल करणार आहेत व त्या ठिकाणी जवळपास १.० लक्ष झाडांची लागवड करणार आहे. शासकीय नियमाप्रमाणे कत्तल केलेल्या झाडांपैकी दीडपट झाडे लावण्यात यावी. कंपनीने प्रकल्प राबविताना हवा प्रदूषणाबाबत योग्य त्या उपाययोजना कराव्या. तसेच जल प्रदूषणासंदर्भात देखील योग्य त्या उपाययोजना कराव्या. तसेच कंपनीमुळे प्रदूषण होणार नाही याबाबत कंपनीने योग्य त्या उपाययोजना करायला पाहिजे. मा. जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की त्यांनी जमीन उपलब्ध करून द्यावी. या परिसरात जमीन उपलब्ध झाल्यास आणखी एक पॅलेट प्लांट या क्षेत्रात आणण्याबाबत आम्ही विचार करत आहे. त्यामुळे परिसरातील बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल. बेरोजगारीमुळे परिसरातील युवक व युवती नक्षली चळवळीकडे वळत होते. या परिसरात माईनिंग हब तयार करण्याबाबत हालचाली सुरू झालेल्या आहेत व या परिसरात माईनिंग हब तयार होणार आहे. भविष्यात अहेरी जिल्ह्याचे ठिकाण होण्याची अपेक्षा असल्याने या क्षेत्रातच माईनिंग हब तयार होईल. त्या ठिकाणी देखील प्रदूषणाच्या पातळीमध्ये वाढ होणार आहे. भारत सरकार व राज्य सरकारच्या अधिसुचनेनूसार खनिज प्रतिष्ठाण मधील निधीचा जास्तीत | प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व प्रश्नांची उत्तरे अनु. क्रं. ३० मध्ये दिले आहेत. सर्व प्रश्न विचारून झाल्यावर प्रत्युत्तर दिले. |

| | | |
|---|---|---|
| | जास्त उपयोग २५ कि.मी. परिघातील गावांकरिता करता येतो. सदर प्रकल्प प्रदूषण विरहीत झाला पाहिजे. या परिसरात जेएसडब्ल्युचा प्रकल्प देखील प्रस्तावित आहे. मा. जिल्हाधिकारी यांनी या परिसरात जागा उपलब्ध करून दिली तर येथे गुंतवणूकदार यायला तयार आहेत. या परिसरातील प्रत्येक व्यक्तिचा कौशल्य विकास करून विकास झाला पाहिजे. | |

२९) **श्री. अविश्यांत पंडा, भा.प्र.से., अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | कंपनीने त्यांच्यातर्फे प्रदूषण नियंत्रण व इतर आश्वासनांबाबत करण्यात येणाऱ्या उपाययोजना व त्याकरिता लागणाऱ्या वेळेबाबत माहिती द्यावी. |

३०) **प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे खालीलप्रमाणे आहेत:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | प्रकल्पाला पर्यावरणीय मंजूरी मिळाल्यानंतर दोन वर्षामध्ये परिसरात सर्व सुविधा उपलब्ध होतील. जनसुनावणीदरम्यान उपस्थित सर्व मुद्यांची पूर्तता आमच्यातर्फे करण्यात येईल. कंपनीतर्फे कुठल्याही प्रकारे उद्योग परिसराबाहेर पाण्याचा विसर्ग करण्यात येणार नाही. परिसरातील व वडलापेठच्या तलावाचे संवर्धन व सौदर्यीकरण करण्यात येईल. तसेच जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय तेथे करून देण्यात येईल. परिसरातील स्थानिक युवक व युवतींना प्रकल्पामध्ये रोजगार देताना प्राधान्य देण्यात येईल. परिसरात रोपवाटीका तयार करण्यात येईल व त्यामध्ये स्थानिकांना रोजगार देण्यात येईल. शिक्षणाच्या सर्व सुविधा पूरविण्यात येतील. परिसरातील युवक व युवतींना तांत्रिक शिक्षण देण्यात येईल. शेतीमध्ये फळझाडे लावण्यास प्रोत्साहन दिले जाईल. आजच्या जनसुनावणीदरम्यान देण्यात आलेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता कंपनीतर्फे करण्यात येईल. |

सदर जनसुनावणी ऑनलाईन प्रणालीद्वारे एकही व्यक्ति उपस्थित नव्हते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| **(उमाशंकर भादुले)**<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(तानाजी यादव)**<br>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(अविश्यांत पंडा, भा.प्र.से.)**<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली, जिल्हा गडचिरोली |